**नाशिक जिल्हा सरकारी व परिषद कर्मचारी सहकारी बँक नियमित नाशिक**
**प्रशासकीय कार्यालय : सोमा हाईटस्, समता संकुल, नवीन आग्रारोड, भाभानगर, मुंबई नाका, नाशिक ४२२०११.**

# वाहन कर्जाचे नियम (अटी व शर्ती)
## (दि.०१/१२/२०२२ पासुन लागू)

१. बँकेने **दु चाकी (टु व्हीलर)** व **चारचाकी (फोर व्हीलर)** वाहनांसाठी दिलेल्या कर्जास बँकेचे **'वाहन कर्ज'** असे संबोधण्यात येईल.

२. सदर कर्जासाठी फक्त नियमित **'सभासद'** पात्र असेल मात्र यासाठी सभासदाचा सभासद होवुन किमान १ वर्षे इतका कालावधी पुर्ण झालेला असणे आवश्यक आहे.

३. बँकेचा कायम सेवक सदरचे कर्ज घेण्यास पात्र राहील तसेच जामीनदार म्हणुन बँकेतील इतर **'कायम सेवेतील'** कर्मचारी चालू शकेल मात्र वरील सर्वांना नियमानुसार **'नाममात्र'** सभासद व्हावे लागेल.

४. वाहन खरेदी करण्यासाठी अधिकृत विक्रेते अथवा डिलरचे कोटेशन अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील. खरेदी करावयाच्या वाहनाच्या किंमतीच्या १०% दुरावा (मार्जिन) रक्कम आपल्या बचत खात्यात कर्ज मंजुरीपुर्वी जमा करावी लागेल किंवा विक्रेत्याला रोख स्वरुपात दिली असल्यास तशी रोख भरणा पावती कर्ज अर्जासोबत जोडावी लागेल.

५. वाहन कर्जाअंतर्गत फक्त नविन वाहनांच्या खरेदीसाठी हे कर्ज दिले जाईल, जुन्या वाहनांसाठी हे कर्ज दिले जाणार नाही.

६. सदर कर्ज मंजुर रकमेच्या किमान २.५% इतके शेअर्स (भाग भांडवल) बँकेत जमा असणे आवश्यक राहील.

७. दुचाकीसाठी रु.२००/- अधिक GST व चारचाकीसाठी रु.१०००/- अधिक GST इतके प्रोसेसिंग शुल्क घेण्यात येईल. सदरची रक्कम स्वतंत्रपणे भरावी लागेल.

८. सदर कर्जाचा व्याजाचा दर द.सा.द.शे. १०.००% इतका राहील. कर्ज खाते थकीत झाल्यास, थकित रकमेवर २% जादा दंडव्याज आकारण्यात येईल. व्याजाची आकारणी मासिक पध्दतीने करण्यात येवुन ती कर्ज खातेवर नावे टाकली जाईल.

९. सदरचे कर्जावरील व्याजाचा दर कमी करणेचा अथवा वाढविणेचा अधिकार संचालक मंडळास राहील.

१०. या प्रकारच्या कर्जाची मर्यादा व मुदत खालीलप्रमाणे राहील.

| अ.क्र. | वाहन प्रकार | कोटेशनच्या | कमाल मर्यादा | परतफेड कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | दु चाकी (टु व्हीलर) | ९०% | रु. २ लाख | ३ वर्षे |
| २ | चार चाकी (फोर व्हीलर) | ९०% | रु. २० लाख | ७ वर्षे |

नाशिक जिल्हा सरकारी व परिषद कर्मचारी सहकारी बँक नियमित, नाशिक * प्रशासकीय कार्यालय नाशिक

११. परतफेडीचा कालावधी वर नमूद केल्याप्रमाणे असला तरी तो कोणत्याही परिस्थितीत कर्जदार सभासदाच्या सेवानिवृत्ती तारखेपेक्षा अधिक राहणार नाही.

१२. कमाल मर्यादा वर प्रमाणे असली तरी कोटेशनच्या ९०% किंवा कमाल मर्यादा यापैकी जी रक्कम कमी असेल तितक्याच रकमेस कर्ज मंजुरी दिली जाईल. मंजुर कर्ज रक्कम चेक अथवा NEFT / RTGS ने डिलरच्या खात्यावर जमा करण्यात येईल.

१३. सदर कर्ज मंजुरी वेळी यापुर्वीच्या व नविन घेत असलेल्या कर्जाचा हप्ता धरुन १/३ पगार हातात पडणे आवश्यक आहे. कर्ज अर्जासोबत अलिकडील वेतनाची स्लीप व बँक खातेचा सहा महिने कालावधीचा उतारा जोडावा लागेल.

१४. रु.५०,०००/- पावेतोच्या कर्जासाठी जामीनदार देण्याची आवश्यकता नाही मात्र रु.५०,०००/- व वरील कर्जास दोन नियमित सभासद जामीनदार म्हणुन देणे आवश्यक राहील.

१५. कर्ज मंजुरीसाठी जादा जामीनदार अथवा जादा सहतारण (Colateral Security) घेण्याचा अधिकार संचालक मंडळास राहील.

१६. आपणांस सदरचे कर्ज परतफेडीसाठी पगार खाते असणाऱ्या बँकेचे किमान ५ चेक्स प्रतिज्ञापत्रासह बँकेस द्यावे लागतील.

१७. सदर कर्जाचा मासिक हप्ता हा ACH / ECS नेच भरणे आवश्यक राहील त्यासाठी ACH / ECS मॅनडेट फॉर्म (Mandate Form) भरुन दयावे लागेल.

१८. आर.सी. पुस्तकावर आर.टी.ओ. यांचे कार्यालयातुन बँकेचा बोजा (नांव) नोंदवुन आणावयाचा असुन फॉर्म क्र. २९, ३०, ३४, ३५ आदि फॉर्म आपल्या सहीनिशी कर्ज प्रकरणासोबत कर्ज मंजुर झाल्यावर दयावे लागतील.

१९. आर.सी. बुक, टॅक्स् रिसिट, एनव्हाईस, वाहनाची विमा पॉलिसी, स्टॅम्प रिसिट बँकेच्या नांवे डिलर / विक्रेत्यांकडुन घेऊन बँकेत जमा करावे लागेल.

२०. बँकेमार्फत खरेदी केलेल्या वाहनाचा कर्जदार व बँकेच्या संयुक्त नावाने 'कॉम्प्रिहेन्सिव्ह विमा' उतरावावा लागेल. दरवर्षी विमा पॉलिसीचे नुतनीकरण करावे लागेल. सभासदाने खरेदी केलेल्या वाहनाचा विमा काढणेची जबाबदारी कर्जदार सभासदांचीच राहील. सदर कॉम्प्रिहेन्सिव्ह विमा हप्त्याची रक्कम भरल्यानंतर सदर पॉलीसी बँकेत जमा करावयाची जबाबदारी देखील कर्जदाराची राहील. विमा पॉलीसी न काढल्यामुळे व वाहनाचा अपघात झाल्याने नुकसान झाले असल्यास त्यास कर्जदार सभासदच संपुर्णपणे जबाबदार राहील, कोणत्याही परिस्थितीत यासाठी बँक जबाबदार राहणार नाही.

२१. वाहनावर सहजगत्या दृष्टीस पडेल अशा रितीने **'कर्मचारी बँक, नाशिक'** असा बँकेच्या नांवाचा बोर्ड लावावा लागेल.

नाशिक जिल्हा सरकारी व परिषद कर्मचारी बँक नियमित नाशिक
प्रशासकीय कार्यालय नाशिक

२२. कर्ज नियम, अटी / शर्ती यांचा भंग झाल्यास संपुर्ण कर्ज रक्कमेची वसुली मुदतपुर्व केली जाईल तसा बँकेस अधिकार राहील व कर्ज रक्कमेच्या वसुलीसाठी येणारा सर्व कायदेशीर खर्च संबंधीत कर्जदार यांचेकडुन वसुल करण्यात येईल.

२३. वाहन कर्जापोटी तारण असलेल्या वाहनाची चोरी झाल्यास व त्या बद्दलचा क्लेम विमा कंपनीकडुन मंजुर झाल्यास क्लेमपोटी मिळणारी संपुर्ण रक्कम कर्जदाराच्या कर्जखाती जमा करण्यात येईल, उर्वरीत शिल्लक राहीलेली रक्कम भरण्याची जबाबदारी कर्जदार व जामीनदार यांची राहील. काही कारणाने विमा कंपनीकडुन क्लेम नाकारला गेल्यास उर्वरीत संपुर्ण कर्ज रक्कम व्याजासह भरण्याची पुर्ण जबाबदारी कर्जदार व जामीनदार यांची वैयक्तिक व संयुक्तीक स्वरुपाची राहील.

२४. बँकेच्या पुर्व परवानगी शिवाय आपणांस कोणत्याही परिस्थीतीत सदर वाहनाची विक्री करता येणार नाही. बँकेने अशी परवानगी दिल्यास सदरची संपूर्ण रक्कम कर्ज खात्यावर भरुन कर्ज खाते बंद करावे लागेल.

२५. कर्ज नियमांच्या वरील अटी व शर्ती यात फेरबदल करणे, वाढविणे अथवा कमी करणे इ. बाबतचे अधिकार बँकेस राहतील.

**संचालक मंडळ सभा दि.२६/११/२०२२ विषय क्र. ११ अन्वये मंजुर सदर निर्णयाची अंमलबजावणी दि.०१/१२/२०२२ पासुन लागु करण्यात येत आहे.**

| | | |
|---|---|---|
| **(सुरेश पाटील)** | **(मंदाकिनी पवार)** | **(सुधीर पगार)** |
| **मुख्य कार्यकारी अधिकारी** | **उपाध्यक्षा** | **अध्यक्ष** |